

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ९७ वा | शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

'पालकमंत्री गोरे हॉटेल सरोवर वर रात्री इतके कष्ट घेतात की त्यांना कधीकधी गोळ्याही खाव्या लागतात !'

रोहित पवारांच्या 'त्या' विधानाने सोलापूरात खळबळ !



सोलापूर (कटूसत्य वृत्त) :- सोलापूरचे पालकमंत्री तथा भाजप नेते जयकुमार गोरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा पेटला आहे. आमदार रोहित पवार यांनी जयकुमार गोरे यांच्यावर अत्यंत खोचक शब्दांत टीका करत सोलापुरातील सरोवर हॉटेलचा उल्लेख केला.

'जयकुमार गोरे सकाळी कष्ट घेतात, दुपारी कष्ट घेतात आणि रात्री तर इतके कष्ट घेतात की कधीकधी गोळ्याही खाव्या लागतात,' असे विधान करत त्यांनी गोरेंच्या कार्यपद्धतीवर निशाणा साधला. त्यांच्या या वक्तव्यामुळे सोलापूरच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

रोहित पवार यांनी जयकुमार गोरे यांच्यावर टीका करताना केवळ राजकीय मुद्द्यांपुरते भाष्य न करता त्यांच्या कथित कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले.

'त्यांचे काळे कारनामे इतके प्रसिद्ध आहेत की आम्हाला तोंड उघडायला लावू नका. तुम्ही काय करता, त्यामुळे आम्ही जेवढे गप्प बसू तेवढेच तुमच्यासाठी चांगले आहे,' अशा शब्दांत त्यांनी इशारावजा टीका केली.

सरोवर हॉटेलचा उल्लेख; राजकीय व सामाजिक वतुर्ळात चर्चेला उधाण

रोहित पवार यांनी सोलापुरातील सरोवर हॉटेलचा थेट उल्लेख केल्यामुळे त्यांच्या विधानाची राजकीय व सामाजिक वर्तुळात विशेष चर्चा सुरू झाली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी केलेल्या या विधानातून नेमका कोणता आरोप अभिप्रेत आहे, याबाबतही उत्सुकता निर्माण झाली आहे.

मात्र, त्यांनी केलेल्या कथित गैरप्रकारांच्या आरोपांबाबत कोणतेही ठोस पुरावे किंवा तपशील या वक्तव्यातून समोर आलेले नाहीत.

त्यामुळे या प्रकरणात संबंधित मंत्र्यांची भूमिका आणि अधिकृत स्पष्टीकरण महत्त्वाचे ठरणार आहे.

उजनी प्रकल्पावरून आधीच संघर्ष; आता आरोपांची धार वाढली!

रोहित पवार आणि जयकुमार गोरे यांच्यातील संघर्ष नवीन नाही. उजनी धरण परिसरात



प्रस्तावित असलेल्या एआय डेटा सेंटर, फ्लोटिंग (पान 2 वर..)

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त सोलापूर जिल्ह्यात ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह'

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त तसेच जनजातीय गौरव दिवसाचे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यात ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात येणार असून, विविध जनकल्याणकारी उपक्रम, आरोग्य व पोषण शिबिरे, लाभार्थी मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहेत.

अशी माहिती प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, हा या सेवा सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या स्वाभिमान, स्वातंत्र्य, हक्क आणि अस्मितेसाठी दिलेला ऐतिहासिक लढा तसेच त्यांचे महान कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या सप्ताहाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, परंपरा, संस्कृती आणि देशाच्या जडणघडणीतील योगदानाचा व्यापक प्रचार-प्रसार केला जाणार आहे.

१५ नोव्हेंबर रोजी रंगभवन सभागृहात मुख्य कार्यक्रम

सेवा सप्ताहाच्या नियोजनानुसार ११ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांच्या पूर्वतयारीसाठी बैठक घेण्यात येणार आहे. १२ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषद आयोजित करून योजनांच्या निवड प्रक्रियेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. १३ नोव्हेंबर रोजी पुढील कार्यक्रमांची पूर्वतयारी तसेच विविध भागांमध्ये होणाऱ्या उपक्रमांचा व्यापक प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे.

१४ नोव्हेंबर रोजी धाराशिव जिल्ह्यात लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वितरित करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला पालकमंत्री, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी (पान 2 वर..)

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सोलापूरात 'फटकारे' व्यंगचित्र स्पर्धा

१५ नोव्हेंबरला हुतात्मा बागेत आयोजन सुषमा अंधारे यांची प्रमुख उपस्थिती

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सोलापूर शहर शिवसेनेच्या वतीने रविवार, १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० ते ११ या वेळेत हुतात्मा बाग, लकी चौक येथे 'फटकारे' या जिल्हास्तरीय व्यंगचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजक तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सोलापूर महानगरप्रमुख महेश धाराशिवकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा खुल्या गटात आयोजित करण्यात आली असून, या स्पर्धेत विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचे व्यंगचित्रकलेतील योगदान आणि त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून नवोदित तसेच अनुभवी व्यंगचित्रकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी संपर्कनेत्या तथा प्रवक्त्या सुषमा अंधारे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच सोलापुरातील नामवंत व्यंगचित्रकार उन्मेश शहाणे आणि शेरशहा डोंगरी हे परीक्षक म्हणून काम पाहणार आहेत. प्रख्यात चित्रकार नितीन खिलारे, आप्पासाहेब काडादी कला महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गायकवाड आणि व्यवसाय कला केंद्र कुचन प्रशालेच्या प्राचार्या प्रतिभा धोत्रे यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



स्पर्धा संपल्यानंतर लगेचच बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. व्यंगचित्रकलेची आवड असलेल्या नागरिकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन महेश धाराशिवकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत प्रताप चव्हाण, भीमाशंकर केंगनाळकर, तुषार अवताडे, सुरेश जगताप आदी उपस्थित होते.





संपादकीय

एसआयआरचा घोळ आणि लोकशाहीची कसोटी !

सर्वोच्च न्यायालयाकडून सातत्याने दिले जाणारे शाब्दिक तडाखे, काही उच्च न्यायालये पिरगळत असलेले कान, काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्षांनी उठवलेले रान आणि लोकमानसातील शंकेचा सूर या सगळ्या गोष्टींचा परिणाम अखेर केंद्रीय निवडणूक आयोगावर झालेला दिसतो. निवडणूक आयोगाची मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी प्रक्रिया, म्हणजेच 'एसआयआर'संशयाच्या भोवऱ्यात गरागरा फिरत आहे. या वादाच्या केंद्रस्थानी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार आहेत. या प्रक्रियेत पात्र असूनही काही कोटी मतदार वगळले गेल्याचा आरोप उच्च रवाने केला जात आहे. अशा या सगळ्या कल्लोळात, प्रारूप मतदारयादीत स्थान न मिळालेल्या मतदारांना अंतिम यादीत स्थान मिळवता यावे, यासाठी निवडणूक आयोगाने सात राज्यांतील मतदारांना एक मार्ग खुला करून दिला आहे.

महाराष्ट्रासह दिल्ली, हरियाणा, आंध्र प्रदेश, झारखंड, तेलंगण आणि नागालँड ही ती सात राज्ये. या प्रकरणी कायदेशीर लढाई सुरू असून, त्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला काही मौखिक सूचना केल्या होत्या. आयोगावरील विरोधी पक्षांच्या आरोपांचा प्रतिवाद सत्तेतील मंडळी करीत असल्याने त्याकडे दुर्लक्ष करून चालेल, अशा धारणेत कदाचित आयोगातील मुखंड असावेत; पण सर्वोच्च न्यायालयाच्या आक्षेपांविरोधात सत्ताधारी निदान उघडपणे आपला कैवार घेण्याची शक्यता कमी, याची जाणीवही त्यांना असावी. वगळलेल्या मतदारांना यादीत समावेशाची एक संधी देणे त्याविना घडते ना!

'देशाचा भौगोलिक विस्तार ही एक बाब. त्याखेरीज, सरकारी कागदपत्रे तयार करण्याबाबत आणि ती नीट राखून ठेवण्याबाबत असलेली अनास्था ही दुसरी बाब. वीतभर पोट जाळण्यासाठी वारा वाहून नेईल तशी लक्षावधी लोकांची होणारी भटकंती वा फरफट हादेखील अतिशय महत्त्वाचा मुद्दा. अशी सगळी पार्श्वभूमी असताना, नको इतक्या घाईने ही मोहीम रेटण्याचा निवडणूक आयोगाचा; पयार्याने केंद्र सरकारचा आग्रह अनाकलनीय. या मोहिमेतील त्रुटी उघड होऊ लागल्यानंतर लोकांमधील नाराजी वाढत गेली. निवडणूक आयोगातील मतभेद, फॉर्म क्रमांक सहाच्या संदर्भातील गोंधळ याने त्यात भरच टाकली. अशा वेळी सामंजस्याने परिस्थिती हाताळणे गरजेचे. ते झाले नाही. परिणाम : देशभरात असंख्य ठिकाणी निवडणूक आयोगाविरोधात रस्त्यांवर उतरलेले विरोधक आणि त्याविरोधात सत्ताधाऱ्यांनीच 'लोकशाही वाचवा'ची हाक देत काढलेले अजब मोर्चे असे रोजचे चित्र. मतदारयाद्यांची सफाई व्हायलाच हवी. अपात्र मतदाराचे मतदान हा लोकशाहीवरील कलंक; त्याच वेळी पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणे, हादेखील तेवढाच मोठा कलंक. पश्चिम बंगालमधील उदाहरण पाहू. या राज्यातील वगळलेल्या जवळपास ९० लाख मतदारांपैकी सुमारे २२ लाखांनी त्यास आव्हान दिले. सप्टेंबर २०२६पर्यंत निर्णय झालेल्या १.२६ लाख अपीलांपैकी तब्बल ९३ टक्के मतदारांनी अपील जिंकले. ही आकडेवारी स्वत: निवडणूक आयोगानेच मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयात दिलेली! ममतांची राजकीय धूळधाण उडवणारी तेथील निवडणूक झाली, ती आपले नागरिकत्व आणि मतदानाचा हक्क सिद्ध करण्यासाठी लढणाऱ्या या २२ लाख मतदारांच्या गैरहजेरीत. या सगळ्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या नव्या निर्णयाकडे बघायला हवे. या निर्णयाने, सात राज्यांतील वगळलेल्या पात्र मतदारांना एक संधी मिळेल, हे स्वागतार्हच. या पुढची जबाबदारी त्या मतदारांची, राजकीय पक्षांची आणि आयोगाचीदेखील. अंतिम मतदारयादीत स्थान मिळवण्यासाठी मतदारांनी आवश्यक ती कागदपत्रे संबंधित बीएलओ वा अन्य अधिकाऱ्यांस देणे क्रमप्राप्तच ठरते. त्याचबरोबर राजकीय पक्षांवरही मोठी जबाबदारी येऊन ठेपते. मतदार 'आपला'आहे की 'दुसऱ्याचा', असा संकुचित विचार न करता या सात राज्यांतील सगळ्याच राजकीय पक्षांनी पात्र असूनही वगळलेल्या मतदारांना आवश्यक कागदपत्रे, तांत्रिक बाबी यांबाबत साह्य करायला हवे. लोकशाही वाचवण्याचा हा खरा मार्ग आहे. लोकशाहीची आणखी कलंकशोभा होणे टाळायचे, तर हे करावेच लागेल.

ऊसतोड कामगारांच्या पालावर पालकमंत्र्यांनी साजरी केली दिवाळी चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंदाचा प्रकाश!

'दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा आणि आपुलकीच्या नात्यांचा सण. मात्र, आपल्या कुटुंबापासून, गावापासून आणि नातेवाईकांपासून शेकडो किलोमीटर दूर राहून ऊसाच्या फडात कष्ट करणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद अनेकदा हरवलेला असतो. आपल्या मुलाबाळांसह पालात राहून उदरनिर्वाहासाठी संघर्ष करणाऱ्या या कष्टकरी कुटुंबांच्या आयुष्यातही दिवाळीचा प्रकाश फुलावा, त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमलावे आणि शासन आपल्या पाठीशी आहे, याची त्यांना जाणीव व्हावी, या भावनेतून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोमवारी (दि. ९ नोव्हेंबर) पंढरपूर तालुक्यातील सोनके येथे ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली."



"पालकमंत्री व शासनाचे आभार! आमच्या ऊसतोड कामगारांच्या पालावर शासन येऊन आमची दिवाळी गोड केली. शासनाने आम्हाला कपडे, चिवडा, साबण असे सर्व काही दिले. पहिल्यांदाच आमची अशी दिवाळी साजरी झाली, त्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला."
- हर्षल पवार, ऊसतोड कामगार, धुळे
-सुनील सोनटक्के
जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.

सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास पालकमंत्री गोरे यांचे सोनके येथील ऊसतोड कामगारांच्या पालावर आगमन झाले. आपल्या पालावर राज्याचे मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री दिवाळी साजरी करण्यासाठी येणार असल्याचे समजल्यापासूनच कामगार कुटुंबीयांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण होते. सकाळपासूनच लहान मुले, महिला आणि कामगार या आगळ्यावेगळ्या दिवाळीच्या स्वागतासाठी उत्साहाने तयारी करत होते.

गावापासून शेकडो किलोमीटर दूर, अनोळखी ठिकाणी कष्टाचे जीवन जगणाऱ्या या कुटुंबांसाठी शासनातील एका महत्त्वाच्या व्यक्तीने थेट आपल्या पालावर येऊन दिवाळी साजरी करणे ही निश्चितच भावनिक आणि सुखद अनुभूती होती.

पालकमंत्री गोरे यांचे आगमन होताच कामगार महिलांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने त्यांनी महिला ऊसतोड कामगारांना भाऊबीज दिली. तसेच कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दिवाळीचा फराळ व लहान मुलांसह सर्वांसाठी नवीन कपडे आणले होते. यावेळी त्यांनी कामगार कुटुंबीयांसोबत फराळाचा आस्वाद घेतला.

लहान मुलांना प्रेमाने फराळ भरवला, तर मुलांना आणलेले नवीन कपडेही स्वत:च्या हाताने परिधान केले.

मंत्री म्हणून नव्हे, तर कुटुंबातील एक सदस्य म्हणून त्यांनी या सर्वांशी संवाद साधत दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

मुलांच्या शिक्षणाची आस्थेने विचारपूस

या भेटीतील विशेष लक्षवेधी क्षण म्हणजे पालकमंत्री गोरे यांनी ऊसतोड कामगारांच्या लहान मुलांशी साधलेला संवाद. या मुलांच्या शिक्षणाची स्थिती, शाळेत जाण्याची व्यवस्था, अभ्यास आणि त्यांना येणाऱ्या अडचणी याबाबत त्यांनी आस्थेने विचारपूस केली. ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची जाणीव ठेवून त्यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाशी चर्चा करून या मुलांसाठी जवळच्या जिल्हा परिषद शाळेत व्यवस्था करण्याबाबत अधिकाऱ्यांशी बोलणार असल्याचे त्यांनी सांगितले. दिवाळीच्या भेटवस्तूंबरोबरच शिक्षणाच्या माध्यमातून मुलांचे भविष्य उज्ज्वल करण्याचा हा प्रयत्न या भेटीचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला.

या ठिकाणी मराठवाडा, विदर्भ तसेच नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यातून आलेले सुमारे ४० ते ५० ऊसतोड कामगार आपल्या कुटुंबीयांसह पालावर वास्तव्यास आहेत. पालकमंत्री गोरे यांनी प्रत्येकाशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्या, कुटुंबाची परिस्थिती, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन गरजा याबाबत त्यांनी विचारपूस केली. आपल्या घरापासून दूर राहून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कष्ट करणाऱ्या या कामगारांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही, शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

यावेळी पालावर आकाशकंदील लावून दिवाळीचा प्रकाश पसरविण्यात आला. या आकाशकंदिलाच्या प्रकाशाप्रमाणेच या कष्टकरी कुटुंबांच्या जीवनातही आनंद, समाधान आणि प्रगतीचा प्रकाश निर्माण व्हावा, यासाठी शासन कटिबद्ध असल्याची भावना पालकमंत्र्यांनी व्यक्त केली.

मंत्री नव्हे, कुटुंबातील सदस्य बनून साजरी केली दिवाळी!

सामान्यत: दिवाळीचा सण प्रत्येकजण आपल्या घरात, आपल्या माणसांसोबत साजरा करतो. मात्र, आपल्या घरापासून दूर राहणाऱ्या या ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन त्यांच्या आनंदात सहभागी होणे, त्यांच्या मुलांना प्रेमाने जवळ घेणे, फराळ भरवणे, महिलांना भाऊबीज देणे आणि त्यांच्या समस्या जाणून घेणे, या कृतींमधून पालकमंत्र्यांनी केवळ सण साजरा केला नाही, तर माणुसकीच्या नात्यालाही उजाळा दिला.

या भेटीदरम्यान कामगारांच्या पालावर आनंद, उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. शासनाकडून मिळालेल्या या प्रेमाच्या भेटीने कामगार कुटुंबीय भारावून गेले होते. आपल्या दु:खाची, कष्टांची आणि अडचणींची दखल घेणारे कोणीतरी आपल्यासोबत आहे, ही भावना त्यांच्या मनात निर्माण झाली होती. अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद तरळत होता, तर काहींचे डोळे या अनपेक्षित आपुलकीने पाणावले होते.

दिवाळीच्या निमित्ताने सोनके येथील ऊसतोड कामगारांच्या पालावर केवळ दिव्यांची रोषणाई झाली नाही, तर आपुलकी, माणुसकी आणि शासनाच्या संवेदनशीलतेचा एक वेगळाच प्रकाश उजळला. घरापासून दूर असलेल्या या कष्टकरी कुटुंबांसाठी ही दिवाळी केवळ सण नव्हती, तर शासन आपल्या सुख-दु:खात सहभागी आहे, याची जाणीव करून देणारा अविस्मरणीय अनुभव ठरली.

दिवाळीच्या फराळातील गोडवा, भाऊबीजेतील मायेचा ओलावा आणि चिमुकल्यांच्या शिक्षणाची घेतलेली जबाबदारी... सोनके येथील ऊसतोड कामगारांच्या पालावर साजरी झालेली ही दिवाळी माणुसकीच्या नात्याचा खरा प्रकाश दाखवून गेली! तर अशा कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीमध्ये शासन सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार यांच्या समवेत असल्याचा विश्वासही दिला.

जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत शेती औजारे व यंत्रसामग्रीसाठी ५० टक्के अनुदान

सोलापूर :- जिल्हा परिषद सोलापूरच्या जिल्हा परिषद सेस (DBT) योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध शेती उपयोगी यंत्रसामग्री व कृषी औजारे ५० टक्के किंवा निर्धारित मयार्देत अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत पीक संरक्षणासाठी श्री पिस्टन स्प्रे पंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप, कृषी अभियांत्रिकीअंतर्गत रोटाव्हेटर, पल्टी नांगर, पेरणी यंत्र, सिंचनासाठी ५ एचपी सबमर्सिबल विद्युत पंप संच, डिझेल इंजिन तसेच कडबाकुट्टी, ताडपत्री व स्लरी फिल्टर या साहित्याचा समावेश आहे. सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अत्यल्पभूधारक, दिव्यांग व महिला शेतकरी या योजनेसाठी अर्ज करू शकतात. इच्छुक शेतकऱ्यांनी सातबारा उतारा, आठ-A उतारा, आधार कार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सादर करावी. अनुसूचित जाती व जमाती प्रवगार्तील शेतकऱ्यांनी जात प्रमाणपत्र, तर दिव्यांग लाभार्थ्यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांची निवड कृषी समितीमार्फत करण्यात येणार असून, निवड झाल्यानंतर एका महिन्याच्या आत खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून पसंतीच्या कृषी औजाराची खरेदी करावी लागेल. खरेदी करण्यात येणारी यंत्रसामग्री अधिकृत सक्षम तपासणी संस्थेने तपासलेली तसेच बीआयएस किंवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणक व तांत्रिक निकषांनुसार असणे बंधनकारक आहे.

मंजूर कृषी औजारांचे अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे जमा करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत आपल्या संबंधित पंचायत समिती कार्यालयातील कृषी विभागाकडे परिपूर्ण अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी केले आहे.

अनगरच्या विष्णुपंत थिटे यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर!

प्रजासत्ताक दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत होणार गौरव

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे, अनगरचे नाव देशपातळीवर पोहोचविणारे तसेच चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीचे भूषण आणि सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र विष्णुपंत थिटे यांना राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे अनगरसह संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यामुळे थिटे यांचे कौतुक व अभिनंदन सहकार परीषदचे अध्यक्ष राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने व मोहोळ नागरी पतसंस्थेचे चेअरमन डॉ.कौशिक गायकवाड यांनी केले. शेती आणि उद्योग क्षेत्रात सातत्याने नवनवीन संधी निर्माण करत कृषी अवजारांच्या उत्पादन क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या विष्णुपंत थिटे यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. ग्रामीण भागात राहूनही जिद्द, मेहनत, दूरदृष्टी आणि उद्योजकीय कौशल्याच्या जोरावर देशपातळीवर आपले नाव पोहोचविणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, आधुनिक शेतीसाठी दर्जेदार कृषी अवजारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कृषी अवजारांच्या उत्पादन क्षेत्रात योगदान देणाऱ्या थिटे यांच्या कार्याला मिळालेली ही राष्ट्रीय पातळीवरील मान्यता त्यांच्या व्यावसायिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.



या पुरस्काराचा गौरव सोहळा २६ जानेवारी २०२७ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या शुभमुहूर्तावर नवी दिल्ली येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावर होणारा हा सन्मान अनगर आणि सोलापूर जिल्ह्यासाठी गौरवाची बाब ठरणार आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातून उद्योजकतेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचा थिटे यांचा प्रवास नव्या पिढीतील तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. स्थानिक पातळीवर उद्योग उभारून त्याला व्यापक स्वरूप देण्याची क्षमता ग्रामीण भागातही आहे, हे त्यांच्या यशातून अधोरेखित होते. विष्णुपंत थिटे यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्याची बातमी समजताच अनगर परिसरासह सोलापूर जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक, मित्रपरिवार आणि नागरिकांमधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीची प्रतिष्ठा अधिक उंचावली असून, जिल्ह्याच्या औद्योगिक वाटचालीलाही नवी प्रेरणा मिळाली आहे.

विष्णुपंत थिटे साहेब यांच्या हातून भविष्यातही अशीच उत्तुंग औद्योगिक आणि सामाजिक कामगिरी घडत राहो, त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव राष्ट्रीयच नव्हे तर जागतिक स्तरावरही व्हावा आणि सोलापूर जिल्ह्याचे नाव सातासमुद्रापार पोहोचावे, अशी अपेक्षा हितचिंतक व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

'पालकमंत्री गोरे हॉटेल सरोवर...

सोलर आणि बॅटरी स्टोरेज प्रकल्पांवरून यापूवीर्ही दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार राजकीय वाद झाला होता.उजनीच्या पाण्यावर शेतकरी, स्थानिक नागरिक आणि मच्छीमारांचा हक्क अबाधित राहिला पाहिजे, अशी भूमिका घेत रोहित पवार यांनी या प्रकल्पांविरोधात आंदोलन केले होते. उजनीच्या पाण्याचा वापर आणि स्थानिकांच्या हिताचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी प्रकल्पाच्या नियोजनावर आक्षेप घेतला होता.

दरम्यान, ग्रीन हायड्रोजन आणि स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर हे दोन प्रस्तावित घटक वगळण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे उजनी प्रकल्पाच्या स्वरूपावरून सुरू असलेला वाद अद्याप पूर्णपणे शांत झालेला नाही.

विकासकामांना विरोध असल्याचा गोरेंचा पलटवार

दुसरीकडे, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रोहित पवार यांच्या उजनी प्रकल्पविरोधी आंदोलनावर टीका केली होती. विकासकामांना विरोध करण्याची भूमिका रोहित पवार घेत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यामुळे उजनीच्या पाण्याच्या प्रश्नापासून सुरू झालेला राजकीय संघर्ष आता वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांपर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे.

माझा इतिहास तुमच्या फॅमिलीला माहित आहे - गोरे यांचे प्रत्युत्तर

रोहित पवार यांच्या विधानामुळे सोलापूरच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. विशेषत: सरोवर हॉटेलचा उल्लेख आणि 'काळे कारनामे' या शब्दप्रयोगामुळे या टीकेला अधिक राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. आ.रोहित पवार यांच्या आरोपांना पालकमंत्री जयकुमार गोरे प्रत्युत्तर देताना म्हणाले कि, "माझा राजकीय जीवनातील संघर्ष मोठा आहे. मी शरद पवारांचा नातू नाही.

उद्योगपतीचा मुलगा नाही. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलो नाही. आजोबा आणि चुलत्याचे नाव घेऊन राजकारण करत नाही. एक-दोनदा नव्हे, तर चार वेळा निवडून आलोय." गोरे आणखी पुढे ते म्हणाले, "मी चुकत असेल तर माज्यावर टीका करा. परंतु पातळी सोडून टीका करणाऱ्यांना मलाही त्याच पातळीवर जाऊन उत्तर देता येते. माझं तोंड उघडायला भाग पाडू नका. कारण माझा इतिहास तुमच्या फॅमिलीला माहित आहे."

उजनीच्या पाण्यापासून सुरू झालेला संघर्ष आता थेट राजकीय आरोपांच्या मैदानात उतरला आहे.

विकासाच्या मुद्द्यावरून सुरू झालेली लढाई वैयक्तिक टीकेपर्यंत पोहोचल्याने सोलापूरचे राजकारण चांगलेच तापले आहे. आता आरोपांपलीकडे जाऊन दोन्ही नेते जनतेसमोर नेमकी वस्तुस्थिती मांडणार का, हा खरा प्रश्न आहे!

पान १ वरून

क्रांतिसूर्य भगवान बिरसा ...

उपस्थित राहणार आहेत.

तर १५ नोव्हेंबर रोजी सोलापूर शहरातील रंगभवन सभागृहात लाभार्थी लाभ वितरणाचा मुख्य कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमालाही पालकमंत्री, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी उपस्थित राहणार असून, पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ वितरित करण्यात येणार आहे.

जात प्रमाणपत्र, आधारकार्डसह विविध दाखल्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे

१६ आणि १७ नोव्हेंबर रोजी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याकरिता आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आधारकार्ड, शिधापत्रिका आणि मतदार नोंदणी यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करताना नागरिकांना मदत होणार आहे.

१८ नोव्हेंबर रोजी आदिवासी आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सक्षमीकरण दिवस साजरा करून सेवा सप्ताहाचा समारोप करण्यात येणार आहे. समारोप कार्यक्रमापूर्वी महानायक क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा तसेच इतर आदिवासी जननायकांना अभिवादन करण्यात येणार आहे.

आदिवासी संस्कृती, लोककला आणि परंपरांना मिळणार व्यासपीठ

या सेवा सप्ताहादरम्यान सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांतील आदिवासीबहुल भागांमध्ये जनजातीय स्वाभिमान संमेलने, मेळावे, शोभायात्रा, जनसभा, क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. आदिवासी समाजाच्या लोककला, लोकनृत्य, लोकगीते, साहित्य, पारंपरिक ज्ञान आणि सांस्कृतिक परंपरांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रदर्शने व सांस्कृतिक मेळावेही आयोजित केले जाणार आहेत.

याशिवाय भगवान बिरसा मुंडा आणि इतर आदिवासी जननायकांचे जीवनकार्य, त्यांचे ऐतिहासिक योगदान, आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास तसेच आदिवासी कल्याणासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती लेख, व्हिडिओ, पॉडकास्ट, रील्स आणि अन्य डिजिटल माध्यमांतून व्यापक स्वरूपात प्रसारित करण्यात येणार आहे.

आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम

जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह हा केवळ जयंती उत्सवापुरता मर्यादित न राहता आदिवासी समाजाला शासकीय योजनांशी जोडणारा, त्यांच्या मूलभूत प्रश्नांबाबत जनजागृती करणारा आणि सामाजिक-सांस्कृतिक अस्मितेला बळकटी देणारा उपक्रम ठरणार आहे. विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून या सप्ताहातील कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर साजरा होत असून 15 नोव्हेंबरला आदरणीय प्रधानमंत्री लाईव्ह संदेश देणार आहेत त्याचा स्क्रीनिंग या कार्यक्रमाच्या दिवशी म्हणजेच 15 नोव्हेंबरला होणार आहे.

सोलापूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे यांनी ही माहिती दिली. या सेवा सप्ताहात आदिवासी समाजातील नागरिकांनी, विशेषत: पात्र लाभार्थ्यांनी सहभागी होऊन विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस सुधाकर भांगरे, मंगेश शिंदे आदी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या २३ योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- मत्स्यव्यावसायिकांचे जीवनमान उंचावणे, आर्थिक समृद्धी साधणे, रोजगार व उद्योजकतेला चालना देणे तसेच मत्स्यव्यवसायातून शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाच्या २३ योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिकांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांनी केले आहे.

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज स्वीकारण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनांमध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसायासाठीच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांचा समावेश आहे. या माध्यमातून पात्र मत्स्यव्यावसायिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे. योजनेंतर्गत उपलब्ध शासकीय डेटाबेसच्या आधारे लाभार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करण्यात येणार आहे. मंजूर होणारे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात ऑनलाइन जमा करण्यात येणार असून, संबंधित सेवांची प्रमाणपत्रेही ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ऑनलाइन अर्जासाठी महाडीबीटी २.० संकेतस्थळाचा वापर करा सोलापूर जिल्ह्यातील सर्व मत्स्यकास्तकार, मच्छीमार, मत्स्यव्यावसायिक तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सभासद यांनी https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर आधार क्रमांकाच्या आधारे महाआयडी तयार करून संबंधित योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करावेत.

अर्ज करताना किंवा महाआयडी तयार करताना काही अडचणी उद्भवल्यास सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. या कार्यालयात मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ९४२३७५८८२४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

संपर्कार्साठी कार्यालयाचा पत्ता : सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, सोलापूर - ४१३००३.

संपर्क अधिकारी : श्री. भि. श. पाटील, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सोलापूर.

संपर्क क्रमांक : ९४२३७५८८२४ / ९९७०५६२९२० ई-मेल : acfsolapur@gmail.com

जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिकांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर ज. मो. शेख यांनी प्रसिध्दी कळविले आहे.

वात्रटिका

नवा व्हेरिएंट

बहुतेक पुन्हा एकदा
नाकातोंडावर मास्क येणार...
पुन्हा पुन्हा हात धुवून
बहुदा लोक बेजार होणार...
संकेत आहेत पण घडू नये
पुन्हा तीच ती उजळणी...
विसरून जावे म्हंटले तर
पुन्हा जागल्या त्या आठवणी...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

पालावर जाऊन पालकमंत्री गोरे यांनी ऊसतोड कामगारांसोबत साजरी केली दिवाळी

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी अडचणी येऊ नयेत, यासाठी त्यांच्या वास्तवाच्या ठिकाणीच शाळा सुरू करण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील सोनके येथे ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कामगारांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी ऊसतोड कामगारांसोबत बसून दिवाळीचा फराळ घेतला. कामगारांना दिवाळीनिमित्त फराळ व आहेर भेट दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने महिलांना भाऊबीजेची भेट देण्यात आली. या भेटीमुळे कामगारांच्या



कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षणाची माहिती घेतली. ऊसतोड कामगारांची मुले प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असून, त्यांची शाळा मूळ गावी असल्यामुळे स्थलांतराच्या काळात त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन शासनाने या मुलांना त्यांच्या वास्तवाच्या ठिकाणीच शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार आजच जिल्हा परिषद सदस्यांशी चर्चा करून स्थानिक पातळीवर शाळा सुरू करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याबाबत पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवाळीनिमित्त ऊसतोड कामगारांना फराळ आणि लहान मुलांना कपडे यांचेही वाटप करण्यात आले. कामगारांच्या पालावर दिवाळी साजरी करताना त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. यावेळी पालकमंत्री व सर्व उपस्थित मान्यवर यांनी ऊसतोड कामगार सोबत दिवाळीचा फराळ ही घेतला. व त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. हे सर्व ऊसतोड कामगार मराठवाडा, विदर्भ व नंदुरबार येथून येथे आलेले आहेत. यावेळी आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दीपक आबा साळुंखे, तहसीलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह विविध अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत प्रत्येक सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांचे घर मंजूर- पालकमंत्री जयकुमार गोरे

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फुटांचे हक्काचे घर देण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्येक सफाई कामगाराने स्वतःच्या हक्काच्या घरात राहावे, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.



पंढरपूर येथे दिवाळीनिमित्त सफाई कामगारांसोबत फराळाचा कार्यक्रम आणि त्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पालकमंत्री बोलत होते. यावेळीआमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, माजीआमदार प्रशांत परिचारक, कामगार नेते गुरु देवडी, दिग्विजय बागल, समाधान देशमुख दिलीप धोत्रे, नगरसेवक अनिल सावंत, नगरसेवक नागेश भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह मोठ्या संख्येने सफाई कामगार उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, अतिरिक्त 150 सफाई कामगारांचा जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी यांनी हा प्रस्ताव मंजूर करून कामगारांना दिवाळीची भेट द्यावी. यामध्ये काही अडचणी असतील, तर त्यातून मार्ग काढण्यात येईल. सफाई कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यास शासन सकारात्मक आहे.

पंढरपूरची आषाढी वारी स्वच्छ आणि सुंदर वारी म्हणून महाराष्ट्रासह देशात आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करीत आहे. मागील दोन-तीन वर्षापासून आषाढी वारीच्या स्वच्छतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामध्ये सफाई कामगारांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आषाढी वारीदरम्यान आपण उत्कृष्ट स्वच्छतेचे काम केल्यामुळे पंढरपूर स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत झाली. या कामामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्री म्हणून आपलेही कौतुक होत आहे. मात्र, या यशाचे खरे शिलेदार सफाई कामगार आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनीही सफाई कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कामगारांना त्यांच्या हक्काची घरे लवकरात लवकर मिळावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिराज उबाळे यांनी केले. त्यांनी २००७ पासून सफाई कामगारांच्या परिस्थितीचा आढावा घेत त्यांच्या विविध समस्या मांडल्या. तसेच कामगारांना हक्काचे घर मिळावे, अशी मागणी केली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने महिला सफाई कामगारांना भाऊबीजेची भेट पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात देण्यात आली. तसेच पुरुष सफाई कामगारांना दिवाळी भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि उपस्थित मान्यवरांनी सफाई कामगारांसोबत दिवाळीचा फराळ घेतला. प्रारंभी महिला कामगारांनी दिवाळीनिमित्त पालकमंत्री महोदय यांचे औक्षण केले. जयाभाऊ क्रिकेट स्पर्धेचे प्रथम पारितोषिक 40-16 या संघाने जिंकल्याबद्दल त्या संघाचे चषक देऊन पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

नॅक मूल्यांकन आराखड्यात तंत्रज्ञान व कौशल्याधिष्ठित शिक्षणास प्राधान्य- प्राचार्य डॉ नागनाथ धर्माधिकारी

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- नॅक मूल्यांकनाचा नवीन आराखडा लवकरच कार्यान्वित होत असून त्यामध्ये माहिती तंत्रज्ञान तसेच कौशल्याधिष्ठित शिक्षणास प्राधान्य देण्यात आले आहे असे प्रतिपादन नवीन नॅक मूल्यांकन आराखडा समितीचे सदस्य प्राचार्य डॉ नागनाथ धर्माधिकारी पुणे यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील आय क्यू ए सी समितीच्या वतीने नॅक मूल्यांकन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते, यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, राज्यातील सर्व महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान मंडळाकडून निधी उपलब्ध झाल्यामुळे भौतिक सुविधा मिळाल्या आहेत परंतु विद्यार्थ्यांना पुरेशी रोजगाराची हमी मात्र मिळाली नाही, म्हणून महाविद्यालयातून बौद्धिक शिक्षणाबरोबरच विविध तंत्रज्ञान तसेच कौशल्य आत्मसात करणारे शिक्षण मिळाले पाहिजेत ही आराखडा कमिटीची इच्छा होती म्हणूनच आराखडा तयार करताना तंत्रज्ञान तसेच कौशल्याधिष्ठित शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले कार्यशाळेचे नियोजन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले कार्यशाळेचा उद्देश प्रा सौरभ भस्मे यांनी सांगितला आभार प्रा राजशेखर पवार यांनी मानले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे, प्राध्यापिका मनीषा शिंदे, जनाबाई चौधरी, सौंदर्या शास्त्री, ऐश्वर्या तारापुरे, प्राची गणेचारी, डॉ बाळासाहेब पाटील,

डॉ राहुल साळुंखे, भीम सोनकांबळे, मधुबाला लोणारी यांनी प्रयत्न केले.

नॅक आराखडा कार्यान्वित होताच मूल्यांकन केले जाईल

नॅक मूल्यांकन आराखडा कार्यान्वित होताच तातडीने महाविद्यालयाचे मूल्यांकन केले जाईल त्यासाठीची सर्व तयारी महाविद्यालयाने पूर्ण केली आहे, आम्ही लिंकच्या प्रतीक्षेत आहोत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

भगवंत मंदिरात 'दिवाळी पाडवा पहाट' भक्तिगीतांच्या सुरांनी रंगली

बार्शी (कटूसत्य वृत्त):- दिवाळी पाडव्याच्या मंगलमय पहाटे बार्शीतील श्री भगवंत मंदिर परिसर भक्तिगीतांच्या सुरांनी न्हाऊन निघाला. नादब्रह्म संगीत क्लासेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी पाडवा पहाट'या विशेष संगीत कार्यक्रमात भक्तिगीते, अभंग, स्तुतिगीते आणि भावगीतांची सुरेल मेजवानी रसिकांना अनुभवायला मिळाली. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात सादर झालेल्या या गीतांनी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.



कार्यक्रमाची सुरुवात बसवराज पुरवंत यांनी 'लंबोदरा हे विघ्नेश्वरम'हे गणेशगीत सादर करून केली. त्यानंतर कु. सिया चौबे यांनी 'हा मोगरा'हे गीत सादर केले. सौ. लता बांगर यांनी 'पंढरीशी जारे आल्यानो संसारा', सौ. भोसले यांनी 'ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर', मीरा मांजरे यांनी 'देहाची तिजोरी', तर वैशाली देशमुख यांनी 'कशासाठी येऊ देवा तुज्या मंदिरात'हे गीत सादर करून वातावरणात भक्तिरस निर्माण केला.

रुद्र मांजरे यांनी 'अबीर गुलाल', सौ. लोळगे यांनी 'कैवल्याचा पुतळा', सौ. मेघना वाघमारे यांनी 'चिंधी बांधते', बसवराज पुरवंत यांनी 'राम गुणगान करी'आणि ओजस्वी राऊत यांनी 'हे आदिमा हे अंतिमा'ही भक्तिगीते सादर केली. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थित रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता.

या कार्यक्रमात मयांक सर्वज्ञ यांनी 'पायोजी मैंने रामरतन धन'या गीताचे हार्मोनियम वादन सादर केले. वैशाली सोनवणे यांनी 'कधी लागेल रे वेड्या', सौ. कातूरे यांनी 'दर्शन दे रे देर भगवंता', तर सौ. प्रतीक्षा अंधारे यांनी 'पाहिला पाहिला नंदाचा नंदन'हे गीत सादर केले. सावंत, देशमुख, भोसले, चौबे आणि ओजस्वी यांनी एकत्रितपणे 'माझी रेणुका माऊली'हे गीत सादर करत समूहगायनाची सुंदर झलक दाखवली.

रुद्र मांजरे यांनी 'हरिभजनाविण काळ'हा अभंग सादर केला. त्यानंतर आराध्या माळी, ओजस्वी राऊत, राजवीर भोसले, शिवन्या कोंढारे, रुद्र मांजरे आणि शिवरत्न मांजरे यांनी 'अच्युतम केशवम'हे स्तुतिगीत सादर केले. या सादरीकरणाला उपस्थितांनी विशेष दाद दिली.

या गीताला पार्थ पाबळे यांनी तबल्याची, तर मयंक क्षीरसागर यांनी हार्मोनियमची साथ दिली.

मृणाली सराफ यांनी 'काय सांगू आता संतांचे उपकार'हा अभंग सादर करून संतविचारांची महती आपल्या गायनातून व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रमुख गायक निलेश मांजरे सर यांनी 'बाजे मुरलिया बाजे', 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म'यांसह विविध अभंग सादर केले. त्यांच्या गायनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. विठ्ठलभक्तीचा भाव व्यक्त करणाऱ्या 'पोटापुरते देई बा विठ्ठला'या भैरवीने या संगीतमय पहाटेची सांगता झाली.

कार्यक्रमात तबल्याची साथ रितेश काजळे यांनी, हार्मोनियमची साथ सुदर्शन शिराळकर आणि दिपाली सहस्त्रबुद्धे यांनी, तर टाळाची साथ सुहास जोशी यांनी केली. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन बसवराज पुरवंत यांनी प्रभावीपणे केले.

नादब्रह्म संगीत क्लासेसच्या विद्यार्थीवृंदाने सादर केलेल्या या कार्यक्रमातून संगीताबरोबरच भक्ती, संतपरंपरा आणि भारतीय संस्कृतीचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. दिवाळी पाडव्याच्या पहाटे भगवंत मंदिरात घुमलेले अभंग, भक्तिगीते आणि स्तुतिगीतांचे स्वर उपस्थितांसाठी एक अविस्मरणीय सांगीतिक अनुभव ठरले.

उसाला पहिली उचल ३५०० रुपये द्या- जिल्हाध्यक्ष नामदेव पवार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्ातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चालू गळीत हंगामात उसाची पहिली उचल प्रतिटन ३ हजार ५०० रुपये मिळावी, अशी ठाम मागणी रयत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळवून देण्यासाठी सर्व ऊस उत्पादकांनी एकजुटीने लढा उभारण्याचे आवाहनही त्यांनी केले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना नामदेव पवार म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळवून देण्याबाबत आमदार आणि साखर कारखानदार फारसे बोलताना दिसत नाहीत. शेतकरी वर्षभर काबाडकष्ट करून ऊस पिकवतो; मात्र त्याच्या घामाचा योग्य मोबदला मिळण्याचा प्रश्न



कायम दुर्लक्षित राहतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आपल्या हक्कांसाठी जागरूक होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी राजकीय पक्ष, जात-पात आणि गटबाजी बाजूला ठेवून ऊसदराच्या प्रश्नावर एकत्र यावे.

एकजुटीच्या ताकदीतूनच शेतकऱ्यांना न्याय मिळू शकतो. त्यामुळे साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून उसाला पहिली उचल प्रतिटन ३५०० रुपये द्यावी, अशी मागणी पवार यांनी केली.शेतकऱ्यांच्या हक्काच्या भावासाठी सर्व ऊस उत्पादकांनी संघटित होऊन संघर्ष करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या २३ योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- मत्स्यव्यावसायिकांचे जीवनमान उंचावणे, आर्थिक समृद्धी साधणे, रोजगार व उद्योजकतेला चालना देणे तसेच मत्स्यव्यवसायातून शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाच्या २३ योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिकांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांनी केले आहे.

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज स्वीकारण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनांमध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसायासाठीच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांचा समावेश आहे. या माध्यमातून पात्र मत्स्यव्यावसायिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे. योजनेंतर्गत उपलब्ध शासकीय डेटाबेसच्या आधारे लाभार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करण्यात येणार आहे. मंजूर होणारे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात ऑनलाइन जमा करण्यात येणार असून, संबंधित सेवांची प्रमाणपत्रेही ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ऑनलाइन अर्जासाठी महाडीबीटी २.० संकेतस्थळाचा वापर करा

सोलापूर जिल्ह्यातील सर्व मत्स्यकास्तकार, मच्छीमार, मत्स्यव्यावसायिक तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सभासद यांनी https://mahadbt2.maharashtra.gov.in/या अधिकृत संकेतस्थळावर आधार क्रमांकाच्या आधारे महाआयडी तयार करून संबंधित योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करावेत. अर्ज करताना किंवा महाआयडी तयार करताना काही अडचणी उद्भवल्यास सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. या कार्यालयात मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ९४२३७५८८२४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

संपर्कासाठी कार्यालयाचा पत्ता : सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, सोलापूर - ४१३००३.

संपर्क अधिकारी : श्री. भि. श. पाटील, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सोलापूर.

संपर्क क्रमांक : ९४२३७५८८२४ / ९९७०५६२९२० ई-मेल : acfsolapur@gmail.com

जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिकांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर ज. मो. शेख यांनी प्रसिध्दी कळविले आहे.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.

मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815

9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

उमेश माने


मो. 9353370779

रेखा बर्वे

मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) सतत कार्यरत राहणारा एक छोटा जीव २) एक उपदिशा ३) रात्रीच्या वेळचे जेवण (इंग्रजीत) ४) हिंदी चित्रपट निर्माता-** चोप्रा ५) इंदिरा गांधींच्या आईचे नाव-*** नेहरू ६) भीती (हिंदीत) ७) पोस्ट, पत्र ९) रंगिला चित्रपटातील महाराष्ट्रीयन अभिनेत्री १०) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** ११) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो १२) संशय (हिंदीत) १३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारे विशेषण १४) शक्तीमान, ताकद असलेला १५) वृक्षाच्या मुळ्या आणि फांद्या यांच्यामधील भाग १८) चिंच (हिंदीत) २०) क्रिकेट स्पर्धेसाठी वापरला जाणारा चेंडू-*** बॉल २१) महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर २५) नक्कल करणारा २७) एक म्हण-****** अक्कल नसते २८) श्रीरामाचा एक बंधू ३०) खिश्चन धर्मसेविका ३२) नजीक, समीप ३४) हा चिरताना डोळ्यात पाणी येते ३५) यशाचे सूत्र, गुपित ३६) देवाचे चिंतन, नमस्कार ३७) पध्दत, रीत (हिंदीत) ३९) हिंदी न्यूज चॅनेल-** तक ४१) क्षण (हिंदीत) ४२) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात

आडवे शब्द : १) आयपीएलमधील अंबानींचा संघ ५) चवीला कडू असे ८) शन उलट लिहा ९) वय (हिंदीत) १०) प्रतिष्ठीत, सन्माननीय १२) जुन्या हिंदी चित्रपटातील एक अभिनेत्री-*** टागोर १३) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पत्र्याची पट्टी १४) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १५) सर्दी बरोबर हा येतो १६) बशीचा जोडीदार १७) क्रिकेटमध्ये गोलंदाजाने बाहेरच्या बाजूस टाकलेला चेंडू, रूंद (इंग्रजीत) १९) तहसीलदार २१) शपथ (हिंदीत) २२) वस्तूचे मूल्य, भाव २३) गोधडी २४) मग्न, एकरूप २६) टेकडी (हिंदीत) २९) मुलाची पत्नी, स्नुषा ३१) लाकूड कापताना होणारा आवाज ३२) जीभ, दिलेला शब्द (हिंदीत) ३३) एक दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता ३५) गाणे गाणारा, गायक ३६) होकारच्या विरूध्दार्थी ३८) कपड्यावरील कचरा घाण ३९) आंब्याचा रस ४०) त्रास, फ्ल्यू (मराठीत) ४३) सलमान, संजय दत्त आणि माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट ४४) मुंबईतील हा गणपती प्रसिध्द आहे-**** चा राजा

सुडोकु - 96

	4	9		3	1			
	3			7		9	8	
8				4				
		6	1	5	7	8		2
	5		2	8	4	1		6
	1							5
	8	5	7		3	4		9
		2			5	3	7	
		4		2		5		1

सोलापूरकरांच्या सेवेत 20 वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस दाखल

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सोलापूरकरांसाठी आधुनिक, आरामदायी आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सेवेचा शुभारंभ करण्यात आला. प्रधानमंत्री इलेक्ट्रिक बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेला मंजूर झालेल्या १०० इलेक्ट्रिक बसेसपैकी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या २० बसेसपैकी १८ बसेस शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांच्या सेवेत दाखल झाल्या. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या बससेवेचा शुभारंभ करण्यात आला.

प्रारंभी महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सोलापूर महानगरपालिका मुख्यालय परिसरात कै. अप्पासाहेब वाराद यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परिवहन विभागाच्या इलेक्ट्रिक बसेसचे विधिवत पूजन करून हिरवा झेंडा दाखविण्यात आला आणि बससेवा नागरिकांच्या सेवेत मार्गस्थ करण्यात आली.

या कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरीताई देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिताताई चाकोते, शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणीताई तळवलकर, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, महिला व बालकल्याण समिती सभापती निर्मला जंगम, मंडई व उद्यान समिती सभापती राजशेखर पाटील, स्थापत्य समिती सभापती विजय चिप्पा, विधी समिती सभापती सत्यजित वाघमोडे नगरसेविका श्रीदेवी फुलारे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका संगीता जाधव, नगरसेविका वंदना गायकवाड, नगरसेवक मेघनाथ येमूल, प्रशांत पल्ली, बिजू प्रधाने, सात्विक बडवे, युवराज सरवदे, ऋषिकेश मेटे, सिद्धेश्वर कमटम, अक्षय अंजीखाने, जयकुमार माने, सत्यनारायण गुर्रम, नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, नगरसेवक व्यंकटेश कोंडी, शिवाजी तात्या वाघमोडे, भारतसिंग बडूरवाले, दीपक तसेच नगरसेविका विजया खरात यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौरांसह पदाधिकाऱ्यांनी केला इलेक्ट्रिक बसमधून प्रवास

बससेवेचा शुभारंभ झाल्यानंतर महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह उपमहापौर, सभागृह नेते, विविध समित्यांचे सभापती आणि नगरसेवकांनी प्रत्यक्ष इलेक्ट्रिक बसमधून प्रवास करून या आधुनिक बससेवेची पाहणी केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक या मार्गाने प्रवास करत पुन्हा सोलापूर महानगरपालिका मुख्यालय येथे आगमन झाले.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी



बसमधील वातानुकूलित सुविधा, प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी आणि प्रवासाचा अनुभव घेतला. नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या या आधुनिक सार्वजनिक वाहतूक सेवेबाबत समाधान व्यक्त करण्यात आले.

वातानुकूलित बसचे किमान तिकीट केवळ १० रुपये

प्रधानमंत्री इलेक्ट्रिक बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेला एकूण १०० इलेक्ट्रिक बसेस मंजूर झाल्या असून, पहिल्या टप्प्यात २० बसेस प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १८ बसेस प्रत्यक्ष सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या असून दोन बसेस राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

या सर्व बसेस वातानुकूलित (AC) असून प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. विशेष म्हणजे या वातानुकूलित बससेवेचे किमान तिकीट किमान १० रुपये ठेवण्यात आले आहे. प्रवासाच्या अंतरानुसार पुढील तिकीट दर निश्चित करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनाही परवडणाऱ्या दरात वातानुकूलित बसमधून प्रवास करता येणार आहे.

शहरातील ९ आणि ग्रामीण भागातील ७ मार्गांवर बससेवा

सोलापूर शहरातील ९ मार्गांवर आणि ग्रामीण भागातील ७ मार्गांवर अशा एकूण १६ मार्गांवर या इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी बससेवेचे दोन सत्रांमध्ये नियोजन करण्यात आले आहे. पहिल्या सत्रात सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत, तर दुसऱ्या सत्रात दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत बससेवा उपलब्ध राहणार आहे.

या बसेस पूर्णतः इलेक्ट्रिक असल्यामुळे इंधनावरील पारंपरिक वाहनांच्या तुलनेत वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांनाही दर्जेदार सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे.

नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करावा- महापौर विनायक कोंड्याल

यावेळी महापौर विनायक कोंड्याल म्हणाले की, प्रधानमंत्री इलेक्ट्रिक बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेला १०० इलेक्ट्रिक बसेस मंजूर झाल्या असून पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या बसेसपैकी १८ बसेस आज दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सोलापूरकरांच्या सेवेत दाखल होत आहेत, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

सोलापूर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना आधुनिक, वातानुकूलित आणि आरामदायी सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. विशेष म्हणजे वातानुकूलित बससेवेचे किमान तिकीट केवळ १० रुपये असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनाही या सेवेचा लाभ घेता येणार आहे. शहरातील ९ आणि ग्रामीण भागातील ७ अशा एकूण १६ मार्गांवर ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

नागरिकांनी खासगी वाहनांचा वापर कमी करून महानगरपालिकेच्या या पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बससेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास तसेच प्रदूषण नियंत्रणास मदत होईल.

सोलापूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला आधुनिक स्वरूप देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्न शील राहील, असेही महापौरांनी सांगितले. दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरू झालेल्या या वातानुकूलित इलेक्ट्रिक बससेवेमुळे सोलापूर शहरासह ग्रामीण भागातील प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी, आधुनिक आणि परवडणारी वाहतूक सुविधा उपलब्ध झाली आहे. सोलापूरच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून नागरिकांनी या बससेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर श्री. विनायक रामकृष्ण कोंड्याल यांनी केले.

अकलूज शहरात ४ कोटी ६० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलूज शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या तब्बल ४ कोटी ६० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. अकलूज नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सौ. रेश्माताई आडगळे व उपनगराध्यक्ष तथा गटनेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील आणि क्रांतिसिंह माने-पाटील यांच्यासह सर्व नगरसेवक यांची प्रमुख उपस्थिती होती.

अकलूज नगरपरिषदेच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेल्या या विकासकामांमध्ये शहरातील विविध भागांतील अंतर्गत रस्ते, बंदिस्त गटारे, समाजमंदिरांची उभारणी आणि विद्युतीकरण अशा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित महत्त्वपूर्ण कामांचा समावेश आहे. प्रभाग क्रमांक ८ मधील लक्ष्मीनारायण नगर येथे ३० लाख रुपये खर्चून रस्ता



करण्यात येणार असून, पाटीदार भवनच्या पाठीमागे १० लाख रुपये खर्चून रस्ता विकसित करण्यात येणार आहे. याच प्रभागातील नवीन बाजारतळ येथे अजित वडे ते आशारफ बागवान तसेच सिद्ध हॉस्पिटल ते संतोष वाघमोडे यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार बांधण्यात येणार असून, त्यासाठी १६ लाख ७५ हजार ११३ रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तसेच १०७० झोपडपट्टी, सरदार तांबोळी, लक्ष्मीनगर ५ येथे रस्ता व गटार बांधण्यासाठी ९ लाख ८५ हजार ८२५ रुपये, तर योगेश गांधी ते महावीर मेडिकल आणि गांधी चौक ओढ्यापर्यंत बंदिस्त गटार बांधण्यासाठीही ९ लाख ८५ हजार ८२५ रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

प्रभाग क्रमांक ९ मधील सुरज लोंढे, विकी लोंढे ते राकले ते भक्ती मार्ग या परिसरात गटार बांधण्यासाठी ९ लाख ९२ हजार २३० रुपये, पटेल ते विजय मोटर्सपर्यंत रस्ता करण्यासाठी ४ लाख ९९ हजार ९५७ रुपये, तर महर्षी कॉलनी येथे समाजमंदिर उभारण्यासाठी ३५ लाख २७ हजार ६४३ रुपये खर्च करण्यात येणार आहेत. प्रभाग क्रमांक ७ मधील जयशंकर उद्यान ते शॉपिंग सेंटरपर्यंत बंदिस्त गटार बांधण्यासाठी २४ लाख ५४ हजार ७२ रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

प्रभाग क्रमांक २ मधील रामायण चौक ते अक्कलूचा राजा परिसरापर्यंत बंदिस्त गटार बांधण्यासाठी २६ लाख ५६ हजार १९८ रुपये, तर शनिमंदिरालगतच्या वसाहतीमध्ये बंदिस्त गटार बांधण्यासाठी ४ लाख ९९ हजार ५६३ रुपये खर्च करण्यात येणार आहेत. प्रभाग क्रमांक ३ मधील अक्कलू लिंगे यांच्या भंगार दुकानामागे रामबाग ६ येथून स्नेहल खंडागळे यांच्या घरापर्यंत रस्ता करण्यासाठी ४९ लाख ९७ हजार ४६३ रुपये, समतानगर व रामबाग परिसरात विद्युतीकरणासाठी ५३ लाख ७३ हजार १११ रुपये, तर हनुमाननगर परिसरात अंतर्गत बंदिस्त गटार बांधण्यासाठी ९ लाख ९९ हजार ८०६ रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

प्रभाग क्रमांक १० मधील ब्लड बँकेच्या पाठीमागून पांडे गोडाऊनपर्यंत गटार बांधण्यासाठी २९ लाख ४५ हजार ५१२ रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रभाग क्रमांक ११ मधील ताम्हाणे कॉम्प्लेक्स ते शिवशंकर बाजारपर्यंत बंदिस्त गटार बांधण्यासाठी ४९ लाख ९८ हजार ०८० रुपये, तर क्रांतिसिंह इंदिरा घरकुल येथील मुख्य रस्ता करण्यासाठी ३९ लाख २६ हजार ९२५ रुपये खर्च करण्यात येणार आहेत. तसेच प्रभाग क्रमांक १२ मधील सुजयनगर १३ येथे रस्ता करण्यासाठी २४ लाख २ हजार २६३ रुपये आणि सुजयनगर ६ येथे रस्ता करण्यासाठी २० लाख २९ हजार ८८८ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शहरातील विविध प्रभागांमध्ये एकाच वेळी रस्ते, गटारे, विद्युतीकरण आणि समाजमंदिरांची कामे हाती घेतल्याने अकलूजच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळणार आहे. या कामांमुळे नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवर उपाययोजना होण्यास मदत होणार आहे. या भूमिपूजन कार्यक्रमाला सर्व प्रभागांतील नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'मनोरमा'चे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर- श्रीकांत मोरे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- येथील मनोरमा साहित्य मंडळ आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा पश्चिम सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १४ नोव्हेंबर रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात मनोरमा राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष शोभा मोरे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे मातृसंस्थेचे उपाध्यक्ष श्रीकांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली दिवसभर चालणाऱ्या या संमेलनात व्याख्यान, परिसंवाद, मुलाखत,कवी संमेलन, पुरस्कार वितरण, पुस्तक प्रकाशन असे भरगच्च कार्यक्रम होतील. राज्याचे माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील तसेच गुजरातमधील बडोदा विद्यापीठाचे डॉ. संजय करंदीकर यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होईल. शिंदे, डॉ. सुमित मोरे, नरेंद्र काळे, कल्याण शिंदे, पद्माकर कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी पुण्याचे प्रसिद्ध वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांचे वक्ता आणि वक्तृत्व या विषयावर व्याख्यान होणार आहे.

शोभा मोरे बांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कवौ संमेलनात अस्मिता गायकवाड, डॉ. कविता मुरूमकर, भरत दौंडकर, डॉ. राधिका देशमुख,विमल माळी, श्रुती हजारे, नितीन कोळवेकर, रजनी रायकर,डॉ. स्मिता पाटील, डॉ. श्रुती वडगबाळकर, डॉ. अरविंद हंगरगेकर, मारुती कटकधोंड,



शिवाजी सातपुते, रामप्रभू माने, सिकंदर मुजावर, योगिराज माने, हरिश्चंद्र पाटील, रामचंद्र इकारे, बालाजी गोप, इंद्रजित घुले, राजेंद्र भोसले, गोविंद काळे आणि १४ नोव्हेंबरला साहित्य संमेलनात होणार वितरण वंदना कुलकर्णी सहभागी होतील, अशी माहिती बँकेच्या कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड यांनी दिली.दुपारच्या सत्रात 'समृध्द मराठी भाषा या विषयावर डॉ. राजशेखर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या परिसंवादात डॉ. राजेंद्र दास, डॉ. शिवाजी शिंदे आणि नितीन कोळवेकर सहभागी होतील. त्यानंतर प्रसिध्द गझल गायक प्रदीप निफाडकर यांची मुलाखत श्रुती हजारे घेणार आहेत.

या संमेलनाच्या समारोप समारंभात मनोरमा दिवाळी अंकाचे तसेच डॉ. शिवाजी शिंदे लिखित निवडक साहित्य कृतींचे अंतरंग व अन्वयार्थ' या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मसाप पुणे या साहित्य संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्रीकांत मोरे यांचा श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी सत्कार केला. या पत्रकार परिषदेला मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे, डॉ. राजशेखर शिंदे, डॉ. शिवाजी शिंदे, बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी, नगरसेवक मनीष केत आदी उपस्थित होते.

डॉ. संजय करंदीकर यांना मनोरमा जीवन गौरव पुरस्कार

या संमेलनात बडोद्याचे डॉ. संजय करंदीकर यांना मनोरमा बैंक राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार देण्यात येणार आहे. २१ हजार रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. बडोदा विद्यापीठात ते मराठी विभागाचे प्रमुख आहेत. याशिवाय हिंगोलीच्या डॉ. राधिका देशमुख (काव्यरत्न),साताऱ्याचे राजेंद्र घाडगे (उत्कृष्ट ग्रंथ), निमगाव महाळुंगेचे भरत दौंडकर, सावनेरचे गणेश भाकरे,सोलापूरचे दत्तात्रय इंगळे व डॉ. सुवर्णा गुंड यांना साहित्य सेवा पुरस्कार देण्यात येणार आहे. पुण्याचे ओंकार काकडे यांना स.रा. मोरे ग्रंथालयाच्यावतीने मनोरमा नवोदित उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार तसेच गोव्याच्या श्रुती हजारे यांना स. रा. मोरे ग्रंथालयाच्यावतीने उत्कृष्ट सूत्रसंचालक पुरस्कार दिला जाणार आहे. प्रत्येकी पाच हजार रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ.राजशेखर शिंदे, डॉ. कविता मुरुमकर, डॉ. शिवाजी शिंदे,

ॲड. सुरेश गायकवाड आणि विद्या भगरे-भोसले यांच्या निवड समितीने पुरस्कारप्राप्त व्यक्तींची निवड केली आहे.

सहकार महर्षि साखर कारखान्यामध्ये २ लाख १ व्या साखर पोत्याचे व २ कोटी २१ लाख व्या वीज विक्री युनिटचे पूजन संपन्न

अकलूज (कटूसत्य वृत्त):- सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामामध्ये उत्पादित झालेल्या २ लाख १ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याचे चेअरमन, जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते तसेच सहविज प्रकल्पातून निर्मिती झालेल्या वीज युनिट पैकी २ कोटी २१ लाख व्या वीज विक्री युनिटचे पूजन कारखान्याचे संचालक, अमरदिप विश्वासराव काळकुटे यांचे शुभहस्ते संपन्न झाले.



कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन, जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची प्रगतीपथावर वाटचाल चालू आहे.

सदर प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, तसेच संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, रावसाहेब मगर, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, महादेव क्षिरसागर, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदीप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख व माजी संचालक रामचंद्र चव्हाण, भिमराव काळे, सुनिल एकतपुरे, मोहनराव लोंढे, राजेंद्र मोहिते, धनंजय चव्हाण तसेच शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, अशोक पताळे, सौ. हर्षाली निंबाळकर कार्यकारी संचालक सुहास यादव व खातेप्रमुख, युनियन प्रतिनिधी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपावली पाडवा आणि श्री पठाण बाबा यात्रेनिमित्त 'ईच्छा भगवंताची' परिवाराचा स्नेहमेळावा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दीपावली पाडव्याचा मंगलमय उत्साह आणि श्री पठाण बाबा यात्रा सोहळ्याचे धार्मिक वातावरण यांचे औचित्य साधून 'ईच्छा भगवंताची' परिवाराच्या वतीने स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. परिवाराचे मार्गदर्शक लक्ष्मण मामा जाधव यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली दरवर्षी आयोजित होणाऱ्या या स्नेहमेळाव्याला यंदाही सर्वपक्षीय राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, महापालिकेतील विविध अधिकारी, पोलीस प्रशासनातील प्रशासकीय अधिकारी कर्मचारी वृंद विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. दीपावली हा प्रकाश, आनंद, मांगल्य आणि बंधुभावाचा सण, तर श्री पठाण बाबा यात्रा हा श्रद्धा आणि एकात्मतेचा प्रतीक असलेला धार्मिक



सोहळा. या दोन्ही पर्वांचा सुंदर संगम साधत आयोजित करण्यात आलेल्या स्नेहभोजनातून सामाजिक सलोखा, सर्वधर्मसमभाव आणि आपुलकीच्या नात्यांचे दर्शन घडले. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येत स्नेहाचा आणि बंधुभावाचा संदेश दिला यावेळी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे दमदार युवा आमदार देवेंद्रदादा कोठे, माजी आमदार दिलीप माने, भाजपा ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू काका, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, सौ मोनिका वहिनी देवेंद्र कोठे, महापौर विनायकदादा कोंड्याल, उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, लताताई फुटाणे, नगरसेवक प्रथमेश कोठे, शिवसेना गटनेते, जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अमोल बापू शिंदे, नगरसेवक बिज्जू प्रधाने, नगरसेविका सौ अश्विनीताई चव्हाण, नगरसेविका सौ. अंबिकाताई नागेश अण्णा गायकवाड, नगरसेविका सौ.चैतालीताई गायकवाड, नगरसेविका श्रीदेवीताई फुलारे, नगरसेविका संगीताताई जाधव, राणी दोडमनी,कल्पनाताई कदम, आनंद मुस्तारे, चित्रा कदम, मनीषा नलावडे, श्रीमती लक्ष्मीताई नडगिरी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत, उद्योगपती कुमार करजगी, माजी सभागृह नेते सुरेश आण्णा पाटील, नगरसेवक राजशेखर पाटील, नगरसेवक विनोद भोसले, स्वीकृत नगरसेवक अक्षय अंजिखाने, ऋषिकेश मेट्रे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम , एमआयएमचे शहराध्यक्ष अझर हुंडेकरी, नगरसेवक शेख आसिफ अहमद, अझरुद्दीन जागीरदार, नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेवक शशिकांत पल्ली, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, शिवसेना नेते मनीष काळजे, आरपीआयचे अजित गायकवाड, शिवसेना नेते सचिन मोहन चव्हाण, मागास सेवा मंडळाचे किरण मोहन चव्हाण, लहू गायकवाड, गणेश पुजारी, चंद्रकांत पवार, महादेव गवळी, अक्षय वाकसे, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, सोलापूर महानगरपालिकेचे नगर अभियंता नीलकंठ मठपती, सामाजिक कार्यकर्ते तथा पर्यावरण प्रेमी महेश देवकर, सागर भोसले, विवेक खरटमल, कैकाडी समाजाचे अध्यक्ष मदन गायकवाड, नागेश गवळी गायकवाड, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, राज्य उत्पादन शुल्क सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गायबू जाधव, डॉ. साहेबराव गायकवाड, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत 'ईच्छा भगवंताची' परिवाराचे मार्गदर्शक लक्ष्मण मामा जाधव, प्रभाग क्रमांक २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड, ॲड. अनिलदादा जाधव आणि युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड यांनी केले धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि सर्वपक्षीय स्नेहभाव जपणारा हा सोहळा सोलापूरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम ठरला. या स्नेहभोजनाचे चंद्रकांत ब्रदर जाधव, राजूदादा जाधव, अंबादास पटप्पा जाधव (अ-24) यांच्या सह ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी मित्र परिवाराने बारकाईने नियोजन केले.

सभापती चेतनसिंह केदार सावंत यांचा वाढदिवस वंचितांसोबत

पालावर राहणाऱ्या कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप!



सांगोला (कटूसत्य वृत्त):- दुष्काळी परिस्थितीत विविध अडचणींचा सामना करणाऱ्या कष्टकरी कुटुंबांशी त्यांनी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या दिवाळी शेतकऱ्यांसोबत साजरी करण्याच्या आवाहनातून प्रेरणा घेत हा उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाचा आनंद सामाजिक बांधिलकी जपत वंचित घटकांसोबत साजरा करत सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी कोळे (ता. सांगोला) येथे पालावर वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप केले. वाढदिवसाचा खरा आनंद केवळ स्वतःचा आनंद साजरा करण्यात नसतो, तर आपल्या कृतीतून दुसऱ्याच्या आयुष्यातआनंदाचा एक क्षण निर्माण करण्यात असतो.

एखाद्या गरजू कुटुंबाच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य, कष्टकरी बांधवांच्या मनात निर्माण झालेली आपुलकी आणि त्यांच्या ओठांवरून मिळालेले आशीर्वाद हीच आयुष्यातील सर्वात समाजातील शेवटच्या घटकाच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, हाच खऱ्या लोकसेवेचा आनंद आहे, अशी भावना यावेळी चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी संभाजी तात्या आलदर, मंडल अध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, ॲड. सचिन देशमुख, अमोल साखरे, संतोष करांडे, शिवाजी आलदर, हरीभाऊ सरगर, हरी आलदर (बोबडे), उद्धव करांडे, दादासाहेब कोळेकर, नवनाथ हातेकर, अनिल येडगे, आकाश सकट, विक्रम माने, निवास पांढरे, वैभव सोनवणे, विनोद कोळेकर ईश्वर सरगर, मारुती सरगर, शरद माने, श्रीनिवास सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.